www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ




अधिक माहिती - पान ३

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ११६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार, १५ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### विश्वसेवा करण्यासाठी भगवान बुद्धांचे विचार आत्मसात करावे - केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू




● मुंबई, विशाल कारंडे :

बौद्ध धर्म हा कर्मावर आधारित आहे. या धर्मात हिंसा नावाची कुठलीही गोष्ट नसून भगवान बुद्ध यांनी जगाला अहिंसा, दया, करुणा हा संदेश दिला आहे. विश्व सेवा करण्यासाठी भगवान बुद्धांचे विचार आत्मसात करायला हवे, असे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी केले. केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाद्वारे 'बुद्धांचा मध्यममार्ग – जागतिक नेतृत्वासाठी मार्गदर्शक' या विषयावर मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर येथे विशेष परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी श्री. रिजिजू बोलत होते. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इकबाल सिंह लालपुरा, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष डॉ. मिलिंद कांबळे, डॉ. दामेंडा पोरजे यांच्यासह भिख्खू व अनुयायी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पान २ वर

### मित्राच्या पत्नीला परपुरुषासोबत शारिरिक संबंध ठेवण्याचा आग्रह, पुण्यातील महिला पोलिसाचे निलंबन

● पुणे, अभिजित येरल्लू :

मित्राच्या पत्नीला परपुरुषासोबत शारिरिक संबंध ठेवण्याचा आग्रह करणाऱ्या आणि जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या पुण्यातील महिला पोलिसाचे निलंबन करण्यात आले आहे. पुण्यातील वाहतूक पोलीस विभागात ही महिला पोलीस कार्यरत होती. अनघा ढवळ असं आरोपी महिला पोलिसाचे नाव आहे. इन्स्टा स्टार म्हणूनही तिची ओळख आहे. पीडित महिलेने याबाबत कोल्हापुरातील गडहिंग्लज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर अनघा ढवळेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पान २ वर

### शाळेत जाणाऱ्या बालिकेवर रिक्षा चालकाचा अत्याचार



● मुंबई, विशाल पाटील

मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होण्याचं प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. चेंबूर परिसरात देखील अशाच प्रकारे खळबळजनक घटना घडली आहे. १३ वर्षीय चिमुरडीवर रिक्षा चालकानं लैंगिक अत्याचार केल्याची माहिती चेंबूर पोलीस ठाण्यातील सूत्रांनी दिली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात रिक्षाचालकावर गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

चेंबूर परिसरातील शाळेत जात असताना रिक्षा चालकानं बालिकेला फूस लावून नेलं. त्यानंतर चिमुरडीला पडक्या इमारतीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. आईला काही न सांगण्याची धमकी दिली. पान २ वर

# नियम डावलून २४ उपजिल्हाधिकाऱ्यांना बढती?



● छत्रपती संभाजीनगर, नितीन देवळेकर :

राज्यातील २४ उपजिल्हाधिकाऱ्यांना भारतीय प्रशासन सेवेत बढती देण्याचा प्रस्ताव दाखल करताना नियम डावलले असल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य अधिकारी संघटनेसह तीन संघटनांनी मुख्य सचिवांकडे केली आहे. पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल सेवेस केंद्र सरकारने राज्य नागरी सेवा म्हणून मान्यता असणे अनिवार्य आहे. मात्र, तशी कागदपत्रेच उपलब्ध नाहीत. केवळ आठ वर्षांची उपजिल्हाधिकारी म्हणून केलेली सेवा पदोन्नतीसाठी पुरेशी नाही, असा आक्षेप नोंदवत बढतीचा प्रस्ताव थांबवावा, अशी विनंती तीन संघटनांच्या अध्यक्ष, सचिवांनी केली आहे.

१ जानेवारी २०२३ रोजीच्या रिक्त जागांवर उपजिल्हाधिकाऱ्यांना भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नती देण्याचा प्रस्ताव नुकताच तयार करण्यात आला आहे. हा प्रस्ताव तयार करताना केंद्रीय प्रशासकीय प्राधिकरणाच्या निर्णयाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या आदेशानुसार केवळ आठ वर्षे उपजिल्हाधिकारी म्हणून काम करणे एवढा एकच निकष पदोन्नतीसाठी पुरेसा नाही, तर केंद्र शासनाने राज्य नागरी सेवेस मान्यता देणे आवश्यक आहे.




ठाणे - काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दलित व आदिवासी बांधवनाच्या आरक्षणाविरोधात केलेल्या वक्तव्य विरोधात ठाण्यात शिवसेनेच्या वतीने राहुल गांधी यांच्या पुतळ्याला जोडे मारू आंदोलन करून पुतळाच्यी जाळून निषेद केला यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना 'सुपरहिट' - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाला लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सर्व योजना सुरूच राहणार
- लाडक्या बहिणींना ३०सप्टेंबरपर्यंत नाव नोंदविता येणार
- कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द केल्याबद्दल केंद्र शासनाचे आभार

● धाराशिव, अभिजित येरल्लू :

मला मुख्यमंत्री पदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे. त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वीतेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. परंडा येथे महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, प्रा. शिवाजी सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महिला सक्षम तर देश सक्षम हे ब्रीद लक्षात घेवून




राज्य शासन मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण ही योजना प्रभावीपणे राबवत आहे. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे. लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद असाच कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेसह राज्य शासनाच्या इतरही योजना यापुढेही सुरु राहतील. लाडक्या बहिणींची साथ देणारा हा एकनाथ आहे असे सांगून या योजनांसाठी निधीची तरतूदही शासनाने केली असून भविष्यात या योजनेचा लाभ टप्प्या-टप्प्याने वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मला गरिबीची जाणीव आहे. गरीब कुटुंबातील महिलांच्या दृष्टीने दीड हजार रुपयांचे मूल्य खूप मोठे आहे, हे अनेकांना माहित नाही. पान २ वर

## 'मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास १७ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

● मुंबई, यश सावंत :

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. पान २ वर

# भारताच्या विकासात पारशी समुदायाचे योगदान मोठे - केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू

● मुंबई, दिगंबर जाधव :

भारताच्या विकासात पारशी समुदायाचे योगदान मोठे आहे. जिओ पारशी योजनेच्या माध्यमातून या समाजाचा सांस्कृतिक वारसा, शिक्षण, लोकसंख्या वाढ आणि रोजगाराच्या संधी यावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी जिओ पारशी योजनेची माहिती व प्रसारासाठी अशा कार्यशाळा आयोजित केल्या जात असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केले.

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक

**जिओ पारशी कार्यशाळा**




कार्य मंत्रालयाद्वारे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जिओ पारशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू बोलत होते.यावेळी राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, केंद्रीय अल्पसंख्याक कार्य राज्यमंत्री जॉर्ज कुरीयन, केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या उपमहानिदेशक ऋचा शंकर, अल्पसंख्याक विकास विभागांच्या प्रधान सचिव रिचा बागला, पारशी मुख्य धर्मोपदेशक उदवाडाचे श्री. दस्तूरजी आणि राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष इकबाल सिंह लालपुरा, उपाध्यक्ष केरसी के. देबू, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान तसेच पारशी समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, पारशी समाजाच्या सामाजिक समस्यांवर चर्चा करणे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी जिओ पारशी कार्यशाळा उपयोगी ठरणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून केंद्र सरकार वैद्यकीय सहाय्य, प्रजनन समस्या असलेल्या जोडप्यांचे समुपदेशन, समुदायाचे आरोग्य आदी उपाययोजनांवर भर देत आहे. जिओ पारशी योजनेच्या प्रचारासाठी कार्यशाळा, शिबिरे आणि प्रिंट तसेच सोशल मीडियाद्वारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

# दिवा, भांडर्लीची जमीन होणार कचरामुक्त?

● ठाणे, सम्यक कासारे :

दिवा आणि भांडर्ली परिसरातील कचराभुमी ठाणे महापालिकेने बंद केली असली तरी त्याठिकाणी कचऱ्याचे ढिग कायम असून या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून तेथील जमीन पुर्वरत करण्यासाठी पालिका प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यात २२ लाख मेट्रीक टनपैकी साडे आठ लाख मेट्रीक टन इतक्या कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावून ही जमीन कचरामुक्त करून पुर्वीप्रमाणे केली जाणार आहे.

राज्य शासनाने ठाणे महापालिकेला कचरा भुमीसाठी भिवंडी येथील आतकोली भागात जागा देऊ केली असून येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीसाठी पालिका प्रशासनाने




हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर डायघर येथेही कचऱ्यापासून वीज निर्मीती करण्याचा प्रकल्प उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित झालेला नसला तरी याठिकाणी कचरा वर्गीकरण करण्याचे काम सुरू झाले आहे. या दोन्ही ठिकाणी कचराभुमी होण्यापुर्वी पालिका प्रशासनाकडे हक्काची कचराभुमी नव्हती. यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणारा ९५० मेट्रिक टन कचरा दिवा भागात टाकला जात होता. येथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक क्षमतेचे प्रकल्प उभारले नाहीत म्हणून हरीत लवाद आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पालिकेला वांरवार नोटीसा येत होत्या.

या कचराभूमीमुळे परिसरात दुर्गंधी पसरण्याबरोबरच सातत्याने आगी लागण्याच्या घटना घडतात. त्यामुळे ही कचराभूमी बंद करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून आंदोलने केली होती. परंतु डायघर प्रकल्प कार्यान्वित होण्यास उशीर होत होता. त्यामुळे डायघर प्रकल्प सुरू होईपर्यंत शहराबाहेर म्हणजेच भांडर्ली भागात पालिकेने जागा भाड्याने घेऊन तिथे कचरा टाकण्यास सुरू केले होते. या कचराभुमीमुळे शेतीचे नुकसान होऊ लागले. यामुळे स्थानिकांनी कचराभुमीस विरोध सुरू केला. अखेर पालिकेने डायघर प्रकल्पाचे काम पहिल्यात सुरू करत भांडर्ली कचराभुमी बंद केली. पान २ वर

# लादेनचा मुलगा हमजा अजूनही जिवंत

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



कुख्यात दहशतवादी ओसामा बिन लादेनचा मुलगा हमजा बिन लादेन जिवंत असल्याचा दावा केला आहे. हमजा अफगाणिस्तानमध्ये अल कायदाचे नेटवर्क उभारण्यात गुंतला आहे. यापूर्वी २०१९ मध्ये अमेरिकेने दावा केला होता की, हमजाचा हवाई हल्ल्यात मृत्यू झाला होता. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही १४ सप्टेंबर २०१९ रोजी याची पुष्टी केली होती. मिररच्या वृत्तात म्हटले आहे की, हमजा आणि त्याचा भाऊ अब्दुल्ला बिन लादेन अफगाणिस्तानमध्ये गुप्तपणे अल कायदाचे नेटवर्क चालवत आहे. तालिबानविरोधी लष्करी संघटना नॅशनल मोबिलायझेशन फ्रंट (एनएमएफ) च्या अहवालाचा हवाला देत मिररने हा दावा केला आहे. एनएमएफने आपल्या अहवालात हमजा आणि त्याच्या साथीदारांची माहिती दिली आहे. पान २ वर

# स्मशानभूमीची जागा हडपणाऱ्यांवर कारवाई करण्याची आरपीआयची मागणी

## आरपीआयचे कल्याण डोंबिवली जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव डोळस यांचे तहसीलदारांना पत्र

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील केडीएमसीच्या बैलबाजार हिंदु स्मशान भूमीतील काही भागावर बेकायदेशीरपणे प्रदान करण्यात आलेले अकृषिक, रूपातरणकर परवानगी रद्द करून हि जागा हडपणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे कल्याण डोंबिवली शहर जिल्हा कार्याध्यक्ष तथा माजी नगरसेवक भीमराव डोळस आणि समाजसेवक निसार शेख यांनी तहसीलदारांकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण पश्चिमेतील बैलबाजार परिसरात केडीएमसीची हिंदु स्मशानभूमी असून त्यावर भूमाफिया "मासा ग्रुप" तर्फे भागीदार सलमान डोलारे यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी कागदपत्र सादर करून हिंदू स्मशान भूमीची जागा अतिक्रमण करण्याच्या हेतुने शासन तरतुद नसून जामिनपुर्वक विषयांकित स्मशानभूमीचे काही भागावर वाणिज्य अकृषिक/ रूपांतरणकर/ एस.आर. ३६४/२३ अन्वये बेकायदेशीर परवानगी मिळवली होती.




संबंधित व्यक्तीने स्मशानभुमीची जागा हडप करण्याच्या दृष्टीने बनावट कागदपत्राअन्वये अकृषिक परवानगी दिनांक १८/०५/२०२३ रोजी मिळवली असून तसेच समाज सेवक निसार शेख व भिमराव डोळस यांच्या तक्रारीवरून तत्कालीन तहसिलदार जयराज देशमुख यांनी सदर अकृषिक परवानगी दिनांक १५/१२/२०२३ रोजी रद्द आदेश पारित केले होती. त्यानंतर पुन्हा या विवादग्रस्त हिंदू स्मशानभूमीच्या जागेवर तत्कालीन तहसिलदार जयराज देशमुख यांनी दुसऱ्यांदा ०१/०१/२०२४ रोजी बेकायदेशीर अकृषिक परवानगी दिली होती.

या प्रकरणात समाजसेवक निसार शेख व भिमराव डोळस यांच्या तक्रारीवरून तत्कालीन तहसिलदार जयराज देशमुख यांनी मासा ग्रुप बिल्डर्सचे भागीदार सलमान डोलारे बरोबर संगनमतीने केलेल्या कृतीवर उपविभागीय जिल्हाधिकारी कल्याण विश्वास गुजर यांच्या दालनात सुनावणी चालू आहे. तसेच भूमाफिया सलमान डोलारे यांनी स्मशानभुमीची जागा हडप करण्याच्या हेतुने खोटे कागदपत्र सादर केल्याप्रकरणी महात्मा फुले पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

यानंतर तहसिलदार सचिन शेजाळ यांच्या आदेशानुसार हिंदु-मुस्लीम समाज तेढ निर्माण होऊ नये व कायदा व सुव्यवस्था ठेवण्याच्या दृष्टीने विवादग्रस्त स्मशानभूमीची जागा मोजणी करून वगळून स्वतंत्र करणे आवश्यक आहे व स्मशानभूमीचे जागेत देण्यात आलेली बेकायदेशीर अकृषिक परवानगी फेरफार नं. ४९१८ रद्द करणे आदेश दिला आहे.

# अंध दाम्पत्याला झालेले बाळ डॉक्टरने परस्पर दत्तक दिले

## आठ दिवसांनी बाळ पालकांच्या स्वाधीन

**कल्याण :** अंध दाम्पत्याला झालेले बाळ डॉक्टरने परस्पर दत्तक दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. अनुदुर्ग धोनी असे डॉक्टरचे नाव असून त्याने कोणत्याही कायदेशीर बाबी व प्रक्रिया पूर्ण न करता हे बाळ आपल्या परिचयातील एका व्यक्तीला दिल्याचा आरोप अंध दाम्पत्याने केला. अखेर अंध दाम्पत्याने सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने या प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर डॉक्टरने तब्बल आठ दिवसांनी त्यांचे बाळ पुन्हा त्यांच्या स्वाधीन केले.

रोहित गुरव व केराबाई गुरव असे अंध दाम्पत्याचे नाव असून ते मोहाने गोळेगाव परिसरात राहतात. त्यांना तीन वर्षांची मुलगी आणि एक वर्षाचा मुलगा आहे. रेल्वेच्या डब्यात भीक मागून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दोन मुले असतानाही केराबाई पुन्हा गर्भवती राहिल्या. आपल्याला तिसरे बाळ नको म्हणून गर्भपात करण्यासाठी ते दाम्पत्य मोहण्यातील गणपती नर्सिंग होममध्ये पोहोचले. बाळ तीन महिने १४ दिवसांचे झाल्याने डॉक्टरने गर्भपात न करता ते बाळ वाढवण्याचा सल्ला दिला.

बाळ जन्माला आल्यानंतर त्याला चांगल्या घरात दत्तक देऊ असे सांगितले. तसेच तुमच्या प्रसूतीचा खर्च व दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी मुलाच्या भविष्याचा विचार करून अंध दाम्पत्याने होकार दिला. मात्र बाळ दत्तक दिल्यानंतर डॉक्टरांनी दोन मुलांच्या शिक्षणासाठी खर्च देणार नसल्याचे सांगताच या अंध दाम्पत्याने सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने डॉक्टरला धारेवर धरले. अखेर डॉक्टरने आठ दिवसांनंतर दत्तक दिलेले बाळ रोहित गुरव यांच्या स्वाधीन केले.




कल्याण पूर्वेतील गणेश सावकारे यांच्या घरातील पर्यावरणपूरक गणपती बाप्पा व आकर्षक लहानपण देगा देवा डेकोरेशन.

# शिवनगरी गणेशोत्सव मंडळाने साकारला कोकणातील गणपती विषयावर चलचित्र देखावा

**कल्याण :** मोहने येथील शिवनगरी गणेशत्सव मंडाळाने साकारलेल्या निसर्ग रम्य वैभवशाली कोकणाचा देखावा गणेश भक्तांच्या डोळयाचे पारणे फेडत असून गणपती उत्सवाचे सांस्कृतिक ठेवा जोपसण्याचा वसा यांचे वास्तव चलचित्रा द्वारे साकरत कोकणचा गणेशोत्सव पट हुबेहूब मांडला आहे.

कल्याण पश्चिमेतील गणेशोत्सव मंडळापैकी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या शिवनगरी गणेशोस्तव मंडळाने यंदा कोकणातील गणपती या विषयावर चलचित्र देखावा सादर केला आहे. ज्यात डोंरमधील दोन वाड्याच्या सह डोंगरावरील निसर्ग रम्य वातावरणातील कोकणातील घरे, ते कोकणचा





कोकणातील पारंपरिक गणेशोत्सव चलचित्र देखावा

घनदाट जंगलातून वाट काढीत जाणारी लालपरी, ते कोकणात जाणाऱ्या बसस्थानकातून सुटणार्या बसेसची उद्घघोषणा, अगदी उंचवरून डोंगरातून जाणरी कोकण रेल्वे, तसेच जागेच्या मानकरी नारळ ते. कोकणातील घरामध्ये गणपती निमित्ताने होणारी सामूहिक आरती, ते कोकणातील बाल्या डॉन्स, जाखडी नृत्याचे दृश्य आणि ध्वनीचा ठेका पाहता देखावा पाहणारे भविक मंत्र मुग्ध होतात.

देवाला गाऱ्हाणे घालण्या पर्यंत सर्व या निमित्ताने सजावट प्रसिद्ध चित्रकार अनिल गोवळकर यांनी केली असून यंदा मंडळाचे ३६ वे वर्ष असून गेली ३ दशकं मंडळाने आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिवनगरी मंडळाचे जुने व नवे सदस्य गणेशोत्सव यशस्वी करण्या साठी रात्रं न दिवस झटत असल्याचे मंडळाचे अध्यक्ष बळीराम जाधव यांनी सांगितले. दरम्यान शिवसेना ठाणे जिल्हा गणेश दर्शन स्पर्धेत शिवनगरी मंडळाला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या विकासाच्या झंजावातापुढे सगळे सर्व्हे फेल ठरणार - शिवसेना शहरप्रमूख रवी पाटील

**कल्याण :** एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यापासून राज्यामध्ये विकासाचा अक्षरशः झंजावत सुरू असून या विकासकामांच्या झंजावातापुढे सर्व सर्व्हे फेल ठरतील असा विश्वास कल्याण पश्चिमेचे शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी व्यक्त केला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव आणि विधानसभा निवडणुकीचे बनत चाललेले वातावरण या पार्श्वभूमीवर प्रसिध्दी माध्यमांशी संवाद साधताना पाटील यांनी हा विश्वास व्यक्त केला.



**मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकनाथ शिंदे हेच बसोत, बाप्पाचरणी प्रार्थना**

लोकसभेनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वातावरण बनू लागले आहे. सर्वच पक्षांमध्ये बरेच इच्छुक उमेदवार असून आमच्या पक्षातही काही जणांची इच्छा आहे. त्यात गैर काही नाही. तर गेल्या अनेक वर्षांपासून आपण गणेशोत्सवानिमित्त कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये फिरत असल्याचे रवी पाटील यांनी सांगितले. कल्याण पश्चिमेतील जनतेची समृद्धी - भरभराट होवो आणि त्यांचे आरोग्य चांगले राहो. यासोबतच राज्यामध्ये पुन्हा एकदा महायुतीचे सरकार बाणून मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हेच होवोत अशी आपण गणपती बाप्पा चरणी प्रार्थना करत असल्याचेही रवी पाटील यांनी सांगितले.

गेल्या ३२ वर्षांपासून आपण शिवसेनेमध्ये एकनिष्ठेने काम करत आहोत. आपण विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक आहोत हे जगजाहीर आहे. आपण पक्षालाही ते सांगितले असून त्यात काही गैर आहे असे मला वाटत नाही. मात्र उमेदवार कोण असावा याचा अंतिम निर्णय पक्ष घेत असतो. तो जो काही निर्णय असेल त्याचा आपण मान राखूनच काम करू अशी भावनाही पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासकामांच्या झंजावातापुढे सगळे सर्व्हे हे फेल ठरतील. गेले २० वर्षे आपण शिंदे साहेबांसोबत काम करत आहोत. ते बोलतात कमी मात्र काम प्रचंड करतात. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना - भाजप आणि राष्ट्रवादी महायुतीच पुन्हा सत्तेमध्ये बसणार असा ठाम विश्वासही पाटील यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# गणेशोत्सवादरम्यान श्रवण क्षमतेच्या आणि श्वसनाच्या समस्यांमध्ये ४० टक्क्यांनी वाढ

**कल्याण :** लहानांपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वच वयोगटातील नागरिकांमध्ये श्रवण क्षमतेच्या आणि श्वसनाच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या कानठळ्या बसणाऱ्या आवाजामुळे श्रवण क्षमतेच्या समस्या तर आगमन सोहळा, विसर्जन सोहळा, मिरवणुकांदरम्यान फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे श्वसनांसंबंधी विकारांची वाढ होत आहे.



अशा समस्यांनी त्रासून रुग्णालयात भेट देणाऱ्या ८ रुग्णांपैकी ४ ज्येष्ठ नागरिक, २ प्रौढ आणि २ तरुणांचा समावेश असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली आहे. त्याचप्रमाणे, फटाक्यांमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनांच्या श्वासोच्छवासामुळे २०-६५ वयोगटातील लोकांमध्ये ब्रॉन्कायटिस आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या वाढतात.

उत्सवादरम्यान असलेल्या मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्ती कमी होते. यामुळे ऐकु येण्यात अडचणी, शब्दांचा चुकीचा अर्थ लावणे किंवा उच्च आवाजात वाजवलेली गाणी आणि व्हिडिओंचा आनंद न घेता येणे अशा समस्या आढळतात. कानाच्या आतील पेशींना झालेल्या नुकसानीमुळे तात्पुरता किंवा कायमचा श्रवणदोष निर्माण होऊ शकते. काही लोकांना टिनिटस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तसेच कानात घंटी वाजणे, गोंधळ ऐकू येणे किंवा शिट्टी वाजणे असे आवाज येत राहतात.

मुंबईतील अपोलो स्पेक्ट्रा रूग्णालयातील कान-नाक-घसा विकार तज्ज्ञ डॉ. प्रशांत केवले म्हणाले की, उत्सवादरम्यान मोठ्या आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे २०-६५ वयोगटातील लोकांच्या कानाचे नुकसान होते. ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या वाढत्या समस्येमुळे तरुण, प्रौढ आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये श्रवण क्षमता आणि श्वसनाच्या समस्यांमध्ये ४०% वाढ झाली आहे. फटाक्यांमधून सोडल्या जाणाऱ्या रसायनांच्या श्वासोच्छवासामुळे २०-६५ वयोगटातील लोकांमध्ये ब्रॉन्कायटिस आणि दमा यांसारख्या श्वसनाच्या समस्या वाढतात.

दररोज, ८ लोकांपैकी ५ ज्येष्ठ नागरिकांना (६० ते ६५ वयोगट) श्वासोच्छवासाचा त्रास, २ प्रौढांना (२५ ते ५५ वयोगट) छातीत घरघर आणि एका तरुणाला (वय २० ते २५ वयोगट) खोकल्याची समस्या उद्भवते. उत्सवादरम्यान ध्वनी आणि वायू प्रदूषण दोन्हीमुळे एखाद्याच्या जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो आणि दैनंदिन कामात व्यत्यय येतो. दारे आणि खिडक्या बंद करा आणि जास्त आावाज अथवा प्रदुषण असताना बाहेर न पडता घरी राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# कल्याणात रेल्वे शाळेतील वर्गात निघाला साप

**कल्याण :** कल्याणातील रेल्वे शाळेच्या वर्गात साप दिसल्याने शिक्षकांसह विद्यार्थ्यांची भितीने धादंल उडाली. वर्गात साप निघाल्याने शाळेतील शिक्षकांनी सुरक्षिततेसाठी विध्यार्थ्यांना त्याठिकाणा पासून दूर ठेवले व कल्याण मध्ये वन्यजीव बचावात सक्रिय रित्या कार्यरत असलेल्या वॉर फाउंडेशनच्या मदत क्रमांकावर संपर्क केला तेव्हा जेष्ठ सर्प मित्र सतीश बोबडे व सुहास बोबडे ह्यांनी घटनास्थळी जाऊन धामण जातीच्या सापाला सुखरूप पकडून जीवनदान दिले. धामण हा साप पूर्णपणे बिनविषारी असून त्यापासून मानवाला कोणताही धोका नाही. तसेच शहरी भागात उंदरांची संख्या कमी करण्यासाठी धामण ह्या सापाचा फार मोठा वाटा आहे. बचाव केलेला सर्प लवकरच वनखात्याच्या अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक अधिवासात सोडणार असल्याची माहिती सर्पमित्र सतीश बोबडे यांनी दिली.

# केडीएमसी क्षेत्रातील सिमेंट कॉँक्रिट रस्त्यांची यांत्रिकी पध्दतीने होणार साफसफाई

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ५४ कि.मी. लांबीचे सिमेंट कॉक्रीट रस्ते साफसफाई यांत्रिकी पध्दतीने करणे प्रशासनाच्या विचाराधीन होते. याकरीता महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार १५वा वित्त आयोगा अंतर्गत डस्ट मिटीगेशन या कंपोनंटमधील उपलब्ध निधीमधून जिईम पोर्टलवर, ऑनलाईन रोड स्विपींग मशीन खरेदी करण्याची निविदा प्रसिध्द करण्यात आली.



विहीत प्रचलीत निविदा प्रक्रिया पार पाडून मे. कॅम ॲव्हीडा, पुणे या कंपनीला जिईम पोर्टलवर या रोड स्विपींग मशीन खरेदी कार्यादेश देण्यात आला. त्यानुसार एकूण ४ रोड स्विपींग मशीन्स लवकरच महानगरपालिकेत दाखल होतील. त्यांनतर या रोड स्विपींग मशीनचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात रितसर नोंदणी होवून, त्यांनतर प्रत्यक्ष रस्ते साफसफाई कामाला सुरवात होईल.

हि रोड स्विपींग मशीन हे ६.५ घ.मी.क्षमतेचे असून सीएनजी इंधनावर चालणारे आहेत ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास देखील मदत होईल. हे वाहन आधुनिक तंत्रज्ञानाचे असून, वाहनाच्या मागील बाजूला मेन ब्रश व दोन चाकांच्यामध्ये दोन साईड ब्रश असणार आहेत. याशिवाय वाहनाच्या मागील बाजूस सक्शन होज पाईप लावलेला असून, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांच्या खाली असणारा कचरा देखील सक्शन होज पाईपव्दारे उचलण्यात येईल.




दर्शन घ्या
फोटो पाठवा

श्री गणरायांचे आगमन झाले आहे.
आपण सर्व बाप्पाच्या दर्शनाला नक्कीच जाणार, मग यावेळी फक्त दर्शन घेऊ नका तर तुम्हाला आवडलेल्या बाप्पाच्या प्रतिमेचा व देखाव्याचा फोटो क्लिक करून आम्हाला नक्की पाठवा.

गणपती बाप्पा मोरया

१. बाप्पाच्या सुखमयी दर्शनास नक्की जा. २. गणरायांच्या प्रतिमेचा (देखाव्यासह) छान छायाचित्र काढा.
३. आम्हांला व्हाट्सऍप (९७०२३८६११८) किंवा ईमेल (dailylokrakshanay@gmail.com) यावर पाठवा.
४. सोबत तुमचे नाव आणि मंडळाचे (सार्वजनिक असल्यास) किंवा परिवाराचे नाव (घरगुती असल्यास) आणि स्थानाचे नाव पाठवा.

97023 86118 | dailylokrakhshanay@gmail.com


# भारतीय संघाचा विजयी 'पंच'; पाकिस्तानवर दणदणीत विजय

**मोकी (चीन) :** आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही भारतीय हॉकी संघाच्या खेळाडूंनी पॅरिस ऑलिम्पिकमधील फॉर्म कायम ठेवला आहे. चीनमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत भारतीय संघानं पुन्हा एकदा दमदार कामगिरी करत सलग पाचवा विजय मिळवला आहे. गटातील शेवटच्या सामन्यात भारतीय संघानं पाकिस्तानचा २-१ असा पराभव केला. भारतीय संघानं या स्पर्धेत एकही सामना गमावलेला नाही. संघाच्या विजयाचा हिरो ठरला कर्णधार हरमनप्रीत सिंग, यानं पेनल्टी कॉर्नरद्वारे २ गोल केले. पाकिस्ताननं सामन्यात पहिला गोल केला असला तरी भारतीय संघानं दमदार पुनरागमन करत सामना २-१ असा जिंकला.



पाकिस्तानचा पहिला गोल, भारताचे दोन : भारत आणि पाकिस्तानचे संघ ३५० दिवसांनंतर सामना खेळत होते. खेळ सुरु होताच पाकिस्ताननं आक्रमणाला सुरुवात केली आणि सातव्या मिनिटाला हन्नान शाहिदच्या सहाय्यानं गोल नोंदवत १-० अशी आघाडी घेतली. मात्र, भारतानं पुनरागमन करण्यास विलंब लावला नाही. भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंगनं १३व्या मिनिटाला भारतासाठी पहिला गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. दुसऱ्या क्वार्टरमध्ये खेळाच्या १९व्या मिनिटाला भारतीय संघाला पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला, त्यानंतर भारतीय संघाच्या 'सरपंच'नं सामन्यातील दुसरा गोल केला. यासह भारतानं पाकिस्तानविरुद्ध २-१ अशी आघाडी घेतली. हीच आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये खेळाच्या ३८व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. मात्र कर्णधार हरमनप्रीत सिंगची हॅट्ट्रिकची संधी हुकली. यानंतरही भारतीय संघाला तिसऱ्या आणि चौथ्या क्वार्टरमध्ये संधी मिळाल्या, मात्र त्यांचं गोलमध्ये रुपांतर होऊ शकलं नाही. दुसरीकडे पाकिस्तानचा संघ सतत संघर्ष करताना दिसला. त्यांनी बरोबरीच्या अनेक संधी गमावल्या. खेळादरम्यान पाकिस्तानच्या अबू महमूद गंभीर जखमी झाला. त्याला स्ट्रेचरवर बाहेर काढावं लागलं, त्यामुळं पाकिस्तान संघाचं मोठं नुकसान झालं.

## करीना कपूर खानच्या 'द बकिंगहॅम मर्डर्स'ची निराशाजनक सुरुवात




करीना कपूर खानची मुख्य भूमिका असलेला 'द बकिंगहॅम मर्डर्स' हा चित्रपट शुक्रवारी (१३ सप्टेंबर रोजी) प्रदर्शित झाला. हा चित्रपट देशभरात मर्यादित स्क्रीन्सवर प्रदर्शित करण्यात आला. देशभरात पहिल्या दिवशी चित्रपटाचे फक्त १३०० शो होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन हंसल मेहता यांनी केले आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी किती कमाई केली, याबाबत माहिती समोर आली आहे.

करीना कपूर खानच्या 'द बकिंगहॅम मर्डर्स' या चित्रपटाने पहिल्या दिवशी बॉक्स ऑफिसवर फार चांगली कामगिरी केलेली नाही. , इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार या चित्रपटाने शुक्रवारी फक्त १.१५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. हा क्राईम थ्रिलर १३ सप्टेंबर रोजी रिलीज झाला. चित्रपटाची कमाई फार चांगली नसली तरी समीक्षकांनी करीना कपूरच्या तिच्या अभिनयाचं कौतुक केलं आहे. २०२४ मधील हा तिचा दुसरा चित्रपट आहे. 'क्रू' नंतर आता याच वर्षी ती दुसऱ्यांदा 'द बकिंगहॅम मर्डर्स' मधून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

करीना कपूर, क्रिती सेनॉन, तब्बू यांचा 'क्रू' चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. या चित्रपटाने देशभरात १५७ कोटी रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर आता तिच्या 'द बकिंगहॅम मर्डर्स' या चित्रपटाकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. चित्रपटाची पहिल्या दिवसाची कमाई फार चांगली नसली तरी वीकेंडला तो किती कमाई करतो हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

या आठवड्यात कोणतेही मोठे चित्रपट रिलीज होणार नाहीयेत, त्यामुळे करीना कपूरच्या क्राइम थ्रिलरच्या कलेक्शनमध्ये वीकेंडला वाढ होऊ शकते, अशी शक्यता आहे. बकिंगहॅम मर्डर्स हा एका ब्रिटिश-भारतीय गुप्तहेरभोवती फिरतो. या चित्रपटाची निर्मिती एकता कपूर आणि करीना कपूर यांनी संयुक्तपणे केली आहे.

## 'चतुरंग'चा सुवर्णमहोत्सवी आनंदसोहळा!

प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात आपल्या जीवनगौरव पुरस्कारासाठी होणाऱ्या 'रंगसंमेलना' व्यतिरिक्त यावर्षी 'चतुरंग प्रतिष्ठान'ने आपल्या पन्नाशीच्या पूर्तते निमित्ताने मुंबईमध्ये याच सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस दोन दिवसांच्या सुवर्णमहोत्सवी आनंद सोहळ्याचे आयोजन केले आहे. १४ विद्या ६४ कलांसारख्या बहुविध क्षेत्रातील प्रतिनिधिक अशा ११ नामवंत गुणवंतांचा 'चतुरंग सुवर्णरत्न सन्माना'ने जाहीर सन्मान करताना, त्यांच्या गौरवाप्रित्यर्थ नृत्य.. नाट्य.. साहित्य.. संवाद.. गायन-वादन.. अशा कलाविष्कारांचे विशेष आयोजन केले आहे. यामध्ये नृत्यांगना शर्वरी जमेनीस यांची 'अर्घ्य' ही नृत्यवंदना आहे.. टेलिव्हिजन मालिकाविश्वात खूप लोकप्रिय झालेल्या 'हास्यजत्रा' या मालिकेतील सचिन गोस्वामी, सचिन मोटे, पृथ्विक प्रताप, रोहित माने, शिवाली परब या हास्यजत्रावीरांची, सुधीर गाडगीळांचा वारसा चालवणारे 'मित्र म्हणे' फेम सौमित्र पोटे हे 'मुलाखत' घेणार आहेत.. कविवर्य कुसुमाग्रज आणि नाटककार शिरवाडकर हे जर समोरासमोर आले-भेटले तर त्यांच्यात होऊ शकणाऱ्या




संवाद-गप्पांचा सौ. धनश्री लेले लिखित 'हा सूर्य... हाच चंद्र!' हा कुतूहलजन्य नाट्यप्रयोग, दिग्पाल लांजेकर यांच्या दिग्दर्शनाखाली अजय पूरकर आणि दीपक करंजीकर सादर करणार आहेत.. गानप्रिय रसिकश्रोत्यांमध्ये सर्वसाधारणपणे खूप लोकप्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या गाण्यांची 'ओठांवरची आवडती गाणी' ही संगीत मैफल, सध्याचे आघाडीचे रसिकपसंत युवा गायक प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे हे सादर करणार आहेत..

चतुरंग संस्थेच्या पायाभरणीकारांना कृतज्ञ वंदन करण्याच्या समारंभात आणि लक्षवेधी, उत्तुंग कारकीर्दीच्या पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. उल्हास कशाळकर, श्री. अशोक पत्की, श्री. दिलीप प्रभावळकर, श्री. बाबासाहेब कल्याणी, मेजर महेशकुमार भुरे, डॉ.अनिल काकोडकर, श्री.महेश एलकुंचवार, श्री.वासुदेव कामत, श्रीमती रोहिणी हट्टंगडी, आणि श्री.चंदू बोर्डे या नामवंत, गुणवंत मान्यवरांचा 'चतुरंग सुवर्णरत्न सन्माना' ने गौरव होणाऱ्या खास समारंभात विशेष सहभागी म्हणून ॲड. उज्वल निकम, अविनाश धर्माधिकारी, देवकी पंडित, धनश्री लेले, विजय केंकरे, सुहास बहुळकर, श्रुती भावे-चितळे, स्वानंद बेदरकर, आदित्य शिंदे, समीरा गुजर आदी नामवंतांचा समावेश असणार आहे....

इतक्या बहुविध समाविष्टतेचा आणि चतुरंग पन्नाशीचा भव्योत्सवी सुवर्णानंद सोहळा शनिवार-रविवार दिनांक २८-२९ सप्टेंबर २०२४ या दोन्ही दिवशी दुपारी ४-०० ते रात्रौ १०-०० या वेळेत दादर-माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरामध्ये चतुरंगने आयोजित केलेला आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानने अतिशय अत्यल्प दराच्या प्रवेशिका ठेवल्या असून, निमंत्रितासाठी ठेवलेल्या राखीव जागांव्यतिरिक्तच्या प्रवेशिका शनिवार दि.२१ सप्टेंबर पासून ticketkhidakee.com वर on line booking पद्धतीने आणि थिएटरवर सकाळ-संध्याकाळ उपलब्ध होतील असे चतुरंगने आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## तिलक वर्माच्या शतकाचं आवेश खानने केलं सॅमी स्टाईल सेलिब्रेशन



दुलीप ट्रॉफीमध्ये दुसऱ्या फेरीचे सामने खेळवले जात आहेत. या दुसऱ्या फेरीत सर्वच भारतीय खेळाडू चांगली कामगिरी करत आहेत. अनंतपूर येथे भारत ए आणि भारत डी यांच्यातील सामन्यात भारताचा मधल्या फळीतील विस्फोटक फलंदाज आणि मुंबई इंडियन्स संघाचा तारणहार तिलक वर्माने शानदारी शतकी खेळी केली. या सामन्यात तिसऱ्या दिवशी भारत ए संघाचा सलामीवीर प्रथम सिंगने शानदार शतक झळकावले आणि त्यानंतर लगेचच तिलक वर्मानेही आपले शतक झळकावले.

दुलीप ट्रॉफीतील पहिल्या डावात तिलक वर्मा फेल ठरला होता. पहिल्या डावात तिलक केवळ ३३ चेंडूत १० धावा करत पॅव्हेलियनमध्ये परतला. आयपीएल २०२४ नंतर तिलक जवळपास ४ महिने मैदानापासून दूर राहिला आणि आता तो दुलीप ट्रॉफीमध्ये परतल्याने पहिल्या डावात फ्लॉप ठरला. भारत ए संघाने पहिल्या डावात ८ गडी गमावून २८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारत डी संघ अवघ्या १८३धावांत गारद झाला.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारत ए संघाने स्कोअरबोर्डवर १ बाद ११५ अशी धावसंख्या नोंदवली होती. तिसऱ्या दिवशी प्रथम सिंहला बरोबर मैदानात तिलक वर्मा नवा फलंदाज म्हणून आला आणि या दोघांनी भारत ए संघाच्या डावाची दणक्यात सुरूवात केली. प्रथमने दुसऱ्या दिवशीच आपले अर्धशतक पूर्ण केले होते, त्यामुळे तिसऱ्या दिवशी त्याचे शतक पूर्ण करण्यासाठी त्याला जास्त वेळ लागला नाही.

## दिनविशेष

**घटना**

१८१२: नेपोलियन बोनापार्टच्या नेतृत्त्वाखाली फ्रेंच सैन्य मॉस्कोमधील क्रेमलिनला येऊन थडकले.

१८२१: कोस्टारिका, ग्वाटेमाला, होंडुरास, निकाराग्वा आणि अल सॅल्व्हाडोर या देशांचा स्वातंत्र्यदिन.

१८३५: चार्ल्स डार्विन जहाजातून गॅलापागोस द्वीपात पोहोचले.

१९१६: पहिल्या महायुद्ध – पहिल्यांदाच रणगाड्यांचा वापर.

१९३५: भारताचे पहिले पब्लिक स्कूल द डून स्कूल सुरू झाले.

१९३५: जर्मनीने देशातील ज्यू लोकांचे नागरिकत्व रद्द केले.

१९४८: भारतीय सैन्याने निजामाच्या वर्चस्वातून औरंगाबाद शहर मुक्त केले.

१९५३: श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची संयुक्त राष्ट्रसंघाच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून निवड.

१९५९: निकिता क्रुस्चेव्ह हे अमेरिकेला भेट देणारे पहिले रशियन नेते.

१९६८: सोव्हिएत संघाच्या झाँड ५ या अंतराळयानाचे प्रक्षेपण.

**जन्म**

१२५४ : 'मार्को पोलो' – इटालियन फिरस्ता व दर्यावर्दी यांचा जन्म. (मृत्यू : ८ किंवा ९ जानेवारी १३२४)

१८६१: 'सर मोक्षमुंडम विश्वेश्वरैया' – भारतरत्न पुरस्कृत यांचा मुद्देनहळ्ळी, म्हैसूर येथे जन्म. भारतात हा दिवस अभियंता दिन म्हणून पाळला जातो (मृत्यू : १४ एप्रिल १९६२)

१८७६: 'शरदचंद्र चट्टोपाध्याय' – बंगाली साहित्यिक यांचा जन्म. (मृत्यू : १६ जानेवारी १९३८)

१८८१ : 'एत्तोरे बुगाटी' – इटालियन ऑटोमोबाइल अभियंते यांचा जन्म.

१८९० : 'अगाथा ख्रिस्ती' – इंग्लिश रहस्यकथा लेखिका यांचा जन्म. (मृत्यू : १२ जानेवारी १९७६)

१९०५ : 'राजकुमार वर्मा' – नाटककार, समीक्षक व हिंदी कवी यांचा जन्म. (मृत्यू : ५ ऑक्टोबर १९९०)

**मृत्यू**

१९९८: 'विश्वनाथ लवंदे' – गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक यांचे निधन.

2008 : 'गंगाधर गाडगीळ' – साहित्यिक, समीक्षक व अर्थतज्ज्ञ यांचे निधन. (जन्म : 25 ऑगस्ट 1923)

## राशि भविष्य

**मेष** – आज नोकरीत वरिष्ठांबरोबर महत्वाच्या विषयावर चर्चा होऊन आपण आखलेल्या योजनेला सरकारकडून फायदा होईल. कार्यालयीन कामासाठी प्रवास घडतील. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. घराच्या सजावटीकडं लक्ष द्याल आणि त्यात बदल करून वातावरण प्रसन्न बनवाल.

**वृषभ** – आज परदेशस्थ स्नेहीजनांकडून आणि मित्रवर्गाकडून आनंददायी बातम्या मिळाल्यानं आपण आनंदित व्हाल. परदेशी जाण्यास इच्छुक असणाऱ्यांना चांगली संधी प्राप्त होईल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. एखाद्या प्रवासामुळं मनास आनंद होईल. नोकरी-व्यवसायात कामाचा व्याप वाढला तरी सुद्धा आर्थिक लाभाची शक्यता आहे.

**मिथुन** – आज एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता आहे. एखादी शस्त्रक्रिया करावी लागेल. रागामुळं स्वतःचीच हानी होण्याची शक्यता असल्यानं डोकं शांत ठेवा. मानहानी संभवते. आज आपण मनाने अस्वस्थ असाल. बोलण्यावर ताबा ठेवून वादविवाद टाळणे हेच आपल्या हिताचे आहे.

**कर्क** – आपल्या राशीपासून चंद्र सातवा भावात असणार आहे. आजचा दिवस मित्र आणि स्वकियांच्या सहवासात आपण आनंदात घालवाल. मनोरंजनातून आनंद मिळेल. व्यापारात फायदा होईल. भागीदारांकडूनही लाभ होईल. छोटासा प्रवास घडेल जो दीर्घकाळ स्मृतीत राहील. समाजात मान-सन्मान वाढेल.

**सिंह** – आपल्या राशीपासून चंद्र सहावा भावात असणार आहे. आज आपलं मन चिंतेने व्यग्र असेल. एक प्रकारची उदासीनता येईल. दैनंदिन व्यवहारात विघ्न येऊ शकतात. सहकाऱ्यांचे सहकार्य आज अजिबात मिळणार नाही. वरिष्ठांशी मतभेद संभवतात. केलेल्या कष्टाचे श्रेय न मिळल्यानं मन उदास होईल.

**कन्या** – आपल्या राशीपासून चंद्र पाचवा भावात असणार आहे. आजचा दिवस विद्यार्थ्यांसाठी प्रतिकूल आहे. संततीविषयी चिंता लागून राहील. सट्टा-शेअर बाजार ह्यात सावध राहून व्यवहार करावेत. मन दुःखी असेल. आज कोणत्याही बौद्धिक चर्चेत भाग घेऊ नये.

**तूळ** – आपल्या राशीपासून चंद्र चौथ्या भावात असणार आहे. आज शारीरिक थकवा व मानसिकदृष्टया आपण व्यस्त राहाल. आईविषयी चिंता राहील. स्थावर संपत्ती विषयीचे व्यवहार सांभाळून करावं लागतील. शक्य असेल तर प्रवास टाळा. कौटुंबिक वातावरण कलहाचं असेल. एखादी मानहानी संभवते.

**वृश्चिक** – आपल्या राशीपासून चंद्र तिसरा भावात असणार आहे. आजचा दिवस लाभदायी आहे. आर्थिक लाभ होतील. नशिबाची साथ मिळेल. मित्रांबरोबरच्या संबंधात सौहार्दता असेल. नवीन कार्य सुरू करण्यासाठी आज अनुकूलता लाभेल. एखादा प्रवास ठरवाल. मन प्रसन्न राहील. प्रतिस्पर्ध्यांवर विजय प्राप्त कराल.

**धनु** – आपल्या राशीपासून चंद्र दुसरा भावात असणार आहे. आज आपल्या मनाची अवस्था द्विधा होईल. कौटुंबिक वातावरण क्लेशदायी राहील. ठरलेली कामे पूर्ण न झाल्यानं मन हताश होईल. आज एखादा महत्वपूर्ण निर्णय न घेणे उचित ठरेल. घरी व नोकरी - व्यवसायात कामाचा व्याप वाढेल.

**मकर** – आज एखादे मंगलकार्य आपण करू शकाल. वातावरण मंगलमय बनेल. मित्र, स्नेही यांच्याकडून आपणास भेटवस्तू मिळतील. व्यापार- व्यवसायात आपले वर्चस्व राहील. आपल्या कामगिरीवर वरिष्ठ खूष होतील. कामे सहजपणे पार पडतील. अनुकूल परिस्थितीचा आपण फायदा करून घ्यावा. मन शांत राहील.

**कुंभ** – कुटुंबियाशी मतभेद संभवतात. आर्थिक देवाण-घेवाण किंवा गुंतवणूक करताना सावध राहावे. कोर्टाच्या कामात सुद्धा सावध राहावं लागेल. खर्च वाढेल. स्वतः तोटा सोसूनही कोणाचे तरी भले कराल. वाणी व राग ह्यावर संयम ठेवावा लागेल. एखादा अपघात संभवतो.

**मीन** – संततीकडून चांगली बातमी मिळेल. बालपणीचे किंवा जुने मित्र भेटल्यानं आनंदीत व्हाल. नवीन मित्रांशी सुद्धा संपर्क होईल व त्याचा भविष्यात फायदा होईल. सामाजिक प्रसंगात भाग घेण्यासाठी बाहेर जावे लागेल. व्यावसायिक क्षेत्रात लाभ होईल. एखाद्या रमणीय स्थळाला भेट द्याल.

# अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्सला ओरल सस्पेन्शन ऑफ हायड्रोक्सीयुरियासाठी पेटंट प्रदान

**मुंबई :** अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स, भारतातील सर्वात मोठ्या कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑर्गनायझेशनला त्यांच्या खोलीचे तापमान स्थिर ओरल सस्पेन्शन ऑफ हायड्रोक्सीयुरियासाठी पेटंट प्रदान करण्यात आले आहे, हे सिकल सेल डिसीजचे व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने एक यशस्वी फॉर्म्युलेशन आहे. हा विकास फार्मास्युटिकल सोल्यूशन्समधील एक नवोदक म्हणून अकुम्सच्या भूमिकेला बळकट करतो, हायड्रोक्स्युरिया सोल्यूशनशी संबंधित स्टोरेज आणि प्रवेशयोग्यता आव्हानांना तोंड देण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रगती प्रदान करतो.

सिकलसेल रोग, एक अनुवांशिक रक्त विकार, ज्यामुळे अशक्तपणा, वारंवार वेदना भाग आणि इतर दुर्बल लक्षणे यांसारख्या गंभीर आरोग्य गुंतागुंत होतात, ज्यामुळे जगभरातील लाखो लोक विशेषतः भारत आणि आफ्रिकेत प्रभावित होतात. २०११ च्या जनगणनेनुसार, भारताच्या लोकसंख्येपैकी ८.६% आदिवासी समुदायातील आहेत, ज्यापैकी अनेकांना एसडीसीने प्रभावित केले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या या महत्त्वाच्या समस्येला संबोधित करताना, अकुम्सचे नवीन फॉर्म्युलेशन २-८°C दरम्यान रेफ्रिजरेशन आवश्यक असलेल्या पारंपारिक हायड्रॉक्सीयुरिया सोल्यूशनपेक्षा एक प्रमुख फायदा देते. ते खोलीच्या तपमानावर स्थिर राहते, व्यापक वितरणासाठी एक व्यावहारिक उपाय प्रदान करते, विशेषत: कोल्ड स्टोरेज सुविधांपर्यंत मर्यादित प्रवेश असलेल्या आदिवासी भागात.

या मैलाच्या दगडावर भाष्य करताना, अकुम्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री संजीव जैन म्हणाले, "भारत आणि आफ्रिकेतील असंख्य एससीडी रुग्णांचे जीवन सुधारण्याची क्षमता असलेल्या फॉर्म्युलेशनसाठी हे पेटंट मिळविल्याचा आम्हाला अभिमान आहे. अकुम्स येथे, आम्ही नाविन्यपूर्ण हेल्थकेअर सोल्यूशन्स वितरीत करण्यासाठी वचनबद्ध आहोत जे वास्तविक-जगातील आव्हानांना तोंड देतात




आणि रुग्णाच्या परिणामांवर सकारात्मक परिणाम करतात आणि अनाथ औषधांसाठी परवडणाऱ्या औषधांवर काम करणे आणि वेळेवर आणि आवश्यक उपचारांसह दुर्मिळ आजारांपासून रुग्णाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आयात केलेल्या औषधांवर अवलंबून राहण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे.

अकुम्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री संदीप जैन म्हणाले, "हे पेटंट 'मेक इन इंडिया' उपक्रमाप्रतीचे आमचे समर्पण आणि भारत सरकारच्या कल्पनेनुसार परवडणारे, उच्च-गुणवत्तेचे फार्मास्युटिकल सोल्यूशन्स ऑफर करण्याची आमची वचनबद्धता प्रतिबिंबित करते. आम्ही नावीन्यतेला प्राधान्य देत आहोत. सर्वांसाठी अत्यावश्यक उपचार सुलभ आणि किफायतशीर बनवण्यासाठी भारतातील विविध राज्यांतील ६७.८ दशलक्ष लोक या समुदायातील अनेकांना सिकलसेल रोगाने प्रभावित केले आहे. सर्व वयोगटातील विशेषत: बालरोग आणि किशोरवयीन रुग्णांसाठी योग्य असलेले अत्यंत आवश्यक फॉर्म्युलेशन, खोलीच्या तपमानावर स्थिर राहते, अधिक सुलभता सुनिश्चित करते आणि विशेषत: कोल्ड स्टोरेज सुविधा असलेल्या आदिवासी भागात व्यापक वितरणासाठी एक कार्यक्षम उपाय प्रदान करते.

अकुम्सचे यश माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखालील भारताच्या राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया मिशनशी संरेखित करते, ज्याचा उद्देश उपचार पर्यायांमध्ये सुधारणा करून एसडीसी रूग्णांच्या जीवनाची गुणवत्ता वाढवणे आहे. हायड्रोक्सीयुरिया कॅप्सूल (५०० एमजी) च्या तुलनेत हायड्रोक्सीयुरिया सस्पेन्शनहे एसडीसी रुग्णांच्या शरीराच्या वजनावर आधारित डोस लवचिकता देते, त्यामुळे बालरोग आणि किशोरवयीन रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण फायदा होतो.

पेटंट केलेले फॉर्म्युलेशन आता आयात केलेल्या हायड्रोक्सीयुरिया सोल्यूशनच्या किमतीच्या काही भागावर येईल, हे भारतात स्वस्त दर्जाची औषधे उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेनुसार आहे. या नवीन पेटंटसह, अकुम्स नाविन्यपूर्णतेद्वारे आरोग्यसेवा पुढे नेत आहे, ज्यांना त्यांची सर्वात जास्त गरज आहे त्यांच्यापर्यंत जीवनरक्षक उपचार पोहोचण्याची खात्री करून घेत आहे.

## रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या सरचिटणीस पदी नंदकुमार म्हात्रे यांची नियुक्ती



**रोहा** - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार)पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरेंचे खांदे समर्थक नंदकुमार म्हात्रे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे या नियुक्तीचे पत्र खुद्द राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी नंदकुमार म्हात्रे यांना कालच्या राष्ट्रवादी स्नेह मेळावा च्या वेळी दिले.

सदर नियुक्ती बाबतीत नवनियुक्त जिल्हा सरचिटणीस नंदकुमार म्हात्रे यांच्या सी संपर्क साधला असता ते म्हणाले ही नियुक्ती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी केले आहे, या नियुक्तीसाठी शिफारसी महीला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली आहे तर प्रयत्न मा. आमदार अनिकेत तटकरे यांनी केली आहे ते पुढे म्हणाले माझे वर तटकरे परिवाराने दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही पक्ष वाढीसाठी सतत प्रयत्नशील राहीन नंदकुमार म्हात्रे यांच्या नियुक्ती ने रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यात विशेष करून यशवंत खार विभागात नवचैतन्य निर्माण झाला आहे. नंदकुमार म्हात्रे यांच्या नियुक्तीचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे सह महीला बालविकास मंत्री आदिती तटकरे,मा. आमदार अनिकेत तटकरे , जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, तालुकाध्यक्ष विनोद भाऊ पाशिलकर , जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, संदीप चोरगे , नवनीत डोळकर, उत्तम नाईक,राजु पोकळे, आदी सहा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अन्य मान्यवर ,पदाधिकारी , कार्यकर्ते यांच्यासह रहीवाशयानी अभिनंदन केले आहे.



**मुंबई :** केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी विराजमान श्री गणेशाचे दर्शन घेतले आणि पूजन केले. यावेळी केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार मिलिंद देवरा, आमदार आशीष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतले गणरायांचे दर्शन



**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईतील मानाच्या गणपतींचे दर्शन घेऊन मनोभावे प्रार्थना केली.

मुंबईतील लालबागचा राजा, मुंबई सेंट्रल येथील हमाल मंडळाचा गणपती तसेच गिरगावच्या केशवजी नाईक चाळ येथील मुंबईतील पहिल्या श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेच्या गणपतीस भेट देऊन राज्यपालांनी दर्शन घेतले. हमाल मंडळाच्या गणपतीची आरती करून राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी तेथील गणेश भक्तांशी संवाद साधला. केशवजी नाईक चाळ येथील गणेशोत्सवाची परंपरा त्यांनी जाणून घेतली.

# IIT Mandi Professor Developes Tool To Detect Bridges Prone To Collapse

**Mandi (Himachal Pradesh) :** Researchers of IIT Mandi have developed a digital model whose algorithm will send an alert on the imminent collapse of bridges. This will prevent major accidents and will be very beneficial for sensitive geographies like Himachal Pradesh.



Dr Shubhamoy Sen of IIT Mandi has innovated this digital model along with researcher Ishwar Kunchum. This model provides real-time data with the help of an algorithm and will be installed at the most vulnerable part of the bridges. It will gauge the actual condition of the bridges through algorithms to ascertain the safety level.

Earlier, old techniques were used to measure the age of the bridges. The information was not accurate. The digital model is supposed to bring accuracy in ascertaining the condition of bridges. During natural calamities like floods or earthquakes, this tool will check whether any bridge is prone to collapse and send real-time alerts across departments which will help avert any major tragedy.

"After long research, it was found that the algorithm of the digital model can be used to accurately assess the age of bridges and the level of damage to them. This will help in preventing accidents by bridge collapse," Dr. Sen said.

He said in future he wants to use the algorithm on the bridges across Himachal Pradesh due to its sensitive geographical position as it has been witness to several disasters.

# Ragpicker Injured in Kolkata Explosion

**Kolkata :** A ragpicker was injured in a blast that took place in central Kolkata on Saturday, a police officer said. The explosion occurred when he was "near a plastic bag" at the crossing of Blochmann Street and SN Banerjee Road.



"The injured person was identified as 58-year-old Bapi Das, who lives on a footpath beside S N Banerjee Road. He is a ragpicker," the officer said. The injured person suffered injuries in his right wrist and is being treated at the Nil Ratan Sircar Medical College and Hospital.

"The area was cordoned off and a bomb disposal squad reached the place. They checked the bag and the vicinity," he said.

# 'Nafrat Ki Dukaan': PM Modi's Dig At Rahul Gandhi In Doda Rally

**Doda (Jammu and Kashmir) :** Attacking Congress leader Rahul Gandhi over his slogan 'Mohabbat ki Dukaan', Prime Minister Narendra Modi said those running "nafrat ki dukaan" (shops of hate) are hiding behind the boards of "mohabbat ki dukaan" (shops of love).

Addressing a public meeting in Doda, Jammu and Kashmir, PM Modi attacked the Congress party, National Conference and People's Democratic Party and said that if their poll promises were implemented, the erstwhile state would go back to the days when schools were put on fire and stone-pelting was a daily affair.

"Congress, PDP and NC want to restore Article 370. That would mean that the three families will once again snatch the reservation of the Pahadis. If their manifestos are implemented, the schools will once again be burnt, children will have stones in their hands, and there will be strikes. They talk about the Constitution. Ye nafrat ki dukaan pe mohabbat ki dukaan ka board laga kar ke ghumte hai," he said.

Attacking the opposition further for keeping the Constitution in their pockets, PM Modi said that they are doing so to hide their "misdeeds." He also slammed the opposition for depriving the Pahadi, SC, ST and OBC communities of reservation in the erstwhile state.



"These days they (the opposition) keep a book of the Constitution in their pockets. Why are they doing this? They are doing so to hide their misdeeds. They had disrespected the soul of the Constitution. Why were there two Constitutions here? Why were Pahadi, SC, ST, and OBC, deprived of reservation? After so many generations, the BJP government has granted them reservations. Today, there are many individuals who, for the first time, have received the right to vote. The Constitution of India grants everyone the right to vote. However, those who carried the Constitution in their pockets had deprived some of you of this right for 75 years," PM Modi added.

Attacking the Congress party over recent remarks by party president Mallikarjun Kharge, PM Modi said, "What is the thinking and intention of the Congress? This also becomes clear from the words of its president. He comes here and says, 'If we got 20 seats more, all the BJP leaders, including Modi, would have been in jail'. Is this their agenda?"

PM Modi said that any resident of Jammu and Kashmir, regardless of his religion, region and cultural affiliation, is a "priority for the BJP government." "I guarantee to safeguard your rights. It's only the BJP that can reinforce statehood to Jammu and Kashmir," he said. The Prime Minister highlighted the work done by the BJP-led government in the Union Territory and said that the central government is connecting the remote parts of Jammu and Kashmir by rail.

# घाटकोपरच्या पोलीस वसाहतीत लागलेल्या आगीत १३ जण जखमी

● घाटकोपर, (प्रतिनिधी) :



घाटकोपर पूर्वेकडील रमाबाई आंबेडकर नगरातील शांती सागर या पोलीस वसाहतीतील डी २ या इमारतीत आग लागून १३ जण जखमी झाले आहेत. त्यात ५ पुरुष आणि ८ महिलांचा समावेश आहे . त्यांना पालिकेच्या राजावाडी रुग्णालयात उपचारसाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, ही आग मध्यरात्री दोनच्या सुमारास लागली असून, त्यात धुराचे लोळ पसरल्याने नागरिकांना श्वास घेणे अवघड झाले होते. मात्र कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. माता रमाबाई आंबेडकर नगर परिसरात शांतीसागर ही पोलीस वसाहत आहे. त्यातील इमारतीच्या तळमजल्यावरील विद्युत केबिनला मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत १३ जण जखमी झाले आहेत. सध्या जखमींवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण आणले. मात्र आगीमुळे इमारतीत धुराचे लोट सर्वत्र पसरले. त्यामुळे रहिवाशांना त्रास झाल्याचे सांगण्यात आले आहे. शांती सागर डी-२ या इमारतीत रात्री भीषण आग लागली. या इमारतीच्या विद्युत मीटर केबिनमध्ये आग लागली होती. यामुळे इमारतीतील वायर जळून खाक झाल्या. तर या आगीमुळे संपूर्ण इमारतीत धुराचे लोट पसरले होते. ही आग लागल्यानंतर इमारतीत रहिवासी आणि स्थानिकांची काही काळ पळापळ सुरु झाली. त्यामुळे काही रहिवाशी हे मजल्यांवर अडकले होते. शांती सागर इमारतीत लागलेल्या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी रवाना झाल्या. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवान आणि अधिकाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करत साधारण दोन तासात आग आटोक्यात आणली. तर दुसरीकडे यादरम्यान विविध मजल्यांवरील अडकलेल्या जवळपास ८५ जणांना रेस्क्यू करण्यात आले असेही सांगण्यात आले.

### १३ जण गुदमरले

या आगीच्या लोळामुळे अनेकांना श्वास घेण्यास त्रास झाला. यावेळी १३ जण गुदमरल्यामुळे त्रास होऊ लागला. त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात ८ महिला आणि ५ पुरुषांचा समावेश आहे. हर्ष अनिल भिसे, स्वीटी संदीप कदम, जान्हवी मिलिंद रायगावकर, प्रियंका काळे, जसिम सलीम सय्यद, ज्योती मिलिंद रायगावकर, फिरोझा इक्बाल शेख, लक्ष्मी लक्ष्मण कदम, लक्ष्मण रामभाऊ कदम, मानसी श्रीवास्तव, अक्षरा सचिन दाते, अबिद शाह, अमिर इक्बाल खान अशी जखमींची नावे आहेत. यातील १२ जणांना ॲडमिट करण्यात आले असून एकाला डिस्चार्ज देण्यात आला आहे अशी माहिती देण्यात आली.

विद्युत भार जास्त झाल्याने ही आग लागल्याचे आम्हाला सांगण्यात आले. सुरुवातीला २ पुरुष आणि इतर महीला असे १३ जण धुराच्या लोळामुले गुदमरले होते. सध्या ते राजावाडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. आम्ही स्वतः घटनास्थळी उपस्थित होतो असे बापू धुमाळे यांनी सांगितले

## मराठा आंदोलकांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना अडवत केली घोषणाबाजी, मराठा आरक्षणासाठी हैद्राबाद गॅझेटच्या मागणीला जोर

● धाराशिव, (प्रतिनिधी) :



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जिल्ह्यात आलेल्या प्रत्येक नेत्याला घेराव घालत मराठा आरक्षणाची मागणी रेटण्याची मराठा आंदोलकांची पद्धत आजही कायम राहिली असून धाराशिवच्या परंड्यात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मराठा आंदोलकांनी अडवल्याचे दिसून आले. धाराशिवच्या हातलाई मंगल कार्यालयात पक्षमेळाव्यासाठी मुख्यमंत्री आले असता मराठा आंदोलकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसमोर घोषणाबाजी केली.

राज्यात एकीकडे विधानसभा निवडणूका तर दुसरीकडे मराठा आरक्षणाचा प्रश्न असा दुहेरी पट मोठा चर्चेचा विषय झाला असून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना अडवण्यापासून सुरु झालेला नेत्यांच्या अडवाअडवीचा ट्रेंड मुख्यमंत्र्यांच्या धाराशिव दौऱ्यातही पहायला मिळाला.

हैद्राबाद गॅझेट लागू करण्याची मागणी

धाराशिवमध्ये लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमासाठी आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थांबवत मराठा आंदोलकांनी थांबवत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मराठा आरक्षणासाठी हैद्राबाद गॅझेट वापरण्याची मागणी यावेळी करण्यात आली असून आरक्षणाचा प्रश्न तात्काळ सोडवावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## आनंद दिघे यांच्या आश्रमात नोटांची उधळण

● ठाणे, (प्रतिनिधी) :

शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांच्या टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात शिंदेच्या शिवसेनेचे काही पदाधिकारी नोटा उधळतानाची एक चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाली आहे. यावरून आता आनंद दिघे यांचे पुतणे आणि ठाकरे गटाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी शिंदेच्या शिवसेनेवर टीका करत आमचा आनंद हरपला अशी प्रतिक्रिया समाजमध्यमांवर नोंदविली आहे.

शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांच्या टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात ठाणेकरांच्या समस्या सोडविण्याचे काम केले. दिघे यांचे समाजकार्य धर्मवीर चित्रपटातून दाखविण्यात आले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिघे यांचे शिष्य म्हणून ओळखले जातात. त्यांनी काही वर्षांपूर्वी आनंद आश्रमाचे नूतनीकरण केले. शिवसेनेतील फुटीनंतर आणि राज्यातील सत्ता बदलानंतर मुख्यमंत्र्यांनी याच कार्यालयातून शिवसेना पक्षाचे काम सुरू केले. सध्या हे कार्यालय मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेच्या ताब्यात आहे.

दरम्यान, या कार्यालयात नोटा उधळतानाची एक चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने खळबळ उडाली आहे. गणपती विसर्जनासाठी आणलेले ढोल पथकाने टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात वादन केले. त्यावेळी त्यांच्यावर टेंभीनाका शाखाप्रमुख निखिल बुडजूडे आणि पोलिस लाईन शाखाप्रमुख नितेश पाटोळे यांनी नोटांची उधळण केली. त्याची चित्रफीत समाजमध्यमांवर प्रसारित झाली आहे. त्यावरून आता संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या असून आनंद दिघे यांचे पुतणे आणि ठाकरे गटाचे ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे यांनी शिंदेच्या शिवसेनेवर टीका केली आहे. "तुम्ही आनंद आश्रमात नोटा उधळल्या ....दिघेसाहेबांच्या समाजसेवेचे पावित्र्य नष्ट केले... आमचा आनंद हरपला " अशी प्रतिक्रिया केदार यांनी समाज माध्यमावर व्यक्त केली आहे.

आनंद दिघे यांची परंपरा आणि त्यांनी सुरू केलेले उत्सव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुढे नेत आहेत. गणपती विसर्जनानंतर ढोल पथके आनंद दिघे यांना भेटण्यासाठी टेंभीनाक्यावर यायची, तेव्हा दिघे हे त्यांना बक्षिस द्यायचे.

## नायाब हस्तकला प्रदर्शनाचे राज्यपालांच्या हस्ते उद्घाटन

● मुंबई, (प्रतिनिधी) :



शिल्पकार सुदर्शन साहू, लघुचित्रकार जय प्रकाश लखियावाल यांच्यासह १०० हून अधिक नामवंत कलाकारांच्या उत्कृष्ट कलाकृती 'नायाब'च्या अखेरच्या आवृत्तीत प्रदर्शित केल्या जातील. दिल्ली आणि हैदराबादमध्ये यशस्वी कार्यक्रम केल्यानंतर नायाबच्या हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबईत १३ सप्टेंबर २०२४ रोजी ताजमहाल पॅलेस हॉटेल, कुलाबा येथ करण्यात आले.

पद्मविभूषण, पद्मश्री, शिल्प गुरू, यासारख्या सर्वोच्च पुरस्कारांचे मानकरी असलेल्या कलाकारांच्या १०० हून अधिक कलाकृतींचे प्रदर्शन या प्रदर्शनात केले. प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनाला नायाबचे संस्थापक संचालक अजय ए सिंग, निशा जमववाल, डॉ. डी आर कार्तिकेयन, सीमा सिंग आणि नायाबच्या संस्थापक आणि मुख्य क्युरेटर आकांशा दीक्षित यांचे सहकार्य लाभले. नायाब हस्तकला प्रदर्शन १३ आणि १४ सप्टेंबर रोजी सर्वांसाठी खुले आहे.

मुंबईतील शोकेसमध्ये दोन दिवस या दुर्मिळ कलाकृतींभोवती सर्वांगीण दृश्य देणारी संभाषणे, संवाद आणि संगीताची मालिका असेल. या कलाकृती भारतातील ७०+ विविध ठिकाणी शिल्पकारांनी तयार केल्या आहेत आणि त्यांची किंमत काही लाखांपासून काही कोटींपर्यंत असेल. भारतातील क्लिष्ट आणि अधिक वेळ घेणार्या सन्मानित हस्तकला प्रकारांमध्ये एक अद्वितीय आकर्षण आणि अभिजातता आहे जी काळाच्या पलीकडे आहे. त्यांचे पारंपारिक सार शतकानुशतके कौशल्य, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक कथांना मूर्त रूप देते, ज्यामुळे ते कलात्मक वारशाचा अमूल्य खजिना बनतात.

नायाबमध्ये, आमची दृष्टी केवळ या कलाप्रकारांचे प्रदर्शन करणे नाही तर त्यांचे कालातीत सौंदर्य आणि गहन महत्त्व साजरे करणे आहे. करतो आहोत, असे नायाबच्या संस्थापक आणि मुख्य क्युरेटर आकांशा दीक्षित यांनी म्हटले आहे. "भारतीय कला प्रकारांच्या एक तुकडीसह, इतिहासात रुजलेल्या आणि शतकानुशतके परिपूर्ण, त्यांच्या पुढील क्षणाचा शोध घेण्याचा प्रयत्न करत, नायाब त्यांना स्पॉटलाइटमध्ये आणण्याचा उपक्रम करत आहे जिथे प्रतिभावान कारागीर त्यांच्या कलाकुसरीच्या भविष्याची कल्पना करू शकतात आणि सौंदर्यशास्त्रज्ञ शोधू शकतात, असे नायाबचे संस्थापक संचालक अजय ए सिंग म्हणाले.

## वांद्रे पश्चिम येथील सार्वजनिक गणेशोत्सवात अवतरली कन्याकुमारी स्वामी विवेकानंद स्मारकाची ५२ फूट उंच प्रतिकृती

● मुंबई, (प्रतिनिधी) :



दरवर्षी प्रसिद्ध मंदिरांची प्रतिकृती साकारणाऱ्या वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे यावर्षी कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद स्मारकाची ५२ फूट उंच प्रतिकृती साकारली आहे.

मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार ॲड. आशीष शेलार हे प्रमुख सल्लागार असलेल्या वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदा २८वे वर्ष आहे. दरवर्षी एका प्रसिद्ध मंदिराची आरास या मंडळातर्फे केली जाते. मागील वर्षी उज्जैन येथील महाकाल मंदिर साकारले होते. त्यापूर्वी केदारनाथ मंदिर, पशुपतीनाथसह राज्यातील विठ्ठल मंदिर, शिर्डीचे साई समाधी मंदिर अशा विविध मंदिरांच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या होत्या.

मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या रत्नागिरीतील वाड्याची प्रतिकृती साकारण्यात आली होती. विविध जाती धर्मियांची वस्ती असलेल्या रेक्लमेशन येथे हा गणेशोत्सव साजरा होतो. तसेच दरवर्षी चित्रपट, क्रिडा, राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील मान्यवर या बाप्पाच्या दर्शनासाठी आवर्जून येतात.

विवकानंद स्मारक हे वावातुराई, कन्याकुमारी येथील पवित्र स्थान आणि प्रसिद्ध पर्यटन क्षेत्र आहे. विवेकानंद स्मारक समितीने १९७० हे स्मारक बांधले. स्वामी विवेकानंद डिसेंबर १८९२मध्ये येथील खडकांवर ध्यानास बसले होते. लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याच मंदिरात ध्यानधारणा केली होती. त्याच मंदिराची हुबेहुब प्रतिकृती वांद्रे येथे साकारण्यात आली आहे.

हैदराबाद येथून आणण्यात आलेल्या दिव्यांची खास रोषणाई करण्यात आली आहे. दरवर्षी मंदिर आणि त्याची रोषणाई पाहण्यासाठी मोठी गर्दी होते. तसेच याही वर्षीची आरास गणेशभक्तांना नक्की आवडेल, असा विश्वास मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र राऊत यांनी व्यक्त केला आहे.

या मंडळास अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाने भेट दिली असता महासंघाकडून मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशीष शेलार यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महासंघाचे अध्यक्ष जयेंद्र साळगावकर, प्रमुख कार्यवाह सुरेश सरनोबत,सह कार्यवाह विकास माने ,शशिकांत तोरस्कर आदि मान्यवर उपस्थित होते.

## राहुल गांधींनी अमेरिकेत केलेलं वक्तव्य संविधानाचा अपमान - रामदास आठवले

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :



विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी आरक्षण हटवण्याबाबत अमेरिकेत कथित वक्तव्य केलं. त्यामुळे राहुल गांधी यांच्याविरोधात देशभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही राहुल गांधी यांच्या या वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला आहे. राहुल गांधी यांनी अमेरिकेत केलेलं वक्तव्य संविधानाचा अपमान आहे. आरक्षण हटवण्याचा राहुल गांधींना काय अधिकार आहे? असा सवाल करत त्यांनी राहुल गांधी यांच्यावर हल्लाबोल केला.

राहुल गांधींनी केला संविधानाचा अपमान : विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत गेल्यानंतर आरक्षण हटवण्याबाबत कथित वक्तव्य केलं आहे. त्यांच्या या वक्तव्याचा विरोधकांनी जोरदार समाचार घेतला आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. अमेरिकेत जाऊन बोलण्याची काहीच गरज नव्हती. राहुल गांधी यांनी अमेरिकेत केलेलं वक्तव्य संविधान विरोधी आहे. हा संविधानाचा अपमान आहे. आरक्षण हटवण्याचा राहुल गांधींना काय अधिकार आहे. काँग्रेस पक्ष हा आरक्षणविरोधी आणि आदिवासी विरोधी आहे. या वक्तव्याबाबत राहुल गांधी यांनी आणि काँग्रेस पक्षानं मापी मागितली पाहिजे, असा जोरदार हल्लाबोल मंत्री रामदास आठवले यांनी केला.

विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी केलेल्या आरक्षणावरील कथित वक्तव्याचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी खरपूस समाचार घेतला. राहुल गांधींनी केलेल्या आरक्षणावरील वक्तव्याचा निषेध म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (रामदास आठवले गट) वतीनं देशभरात आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# 'हे माझे आनंदाचं ठिकाण, मला अंतराळात राहायला आवडतं', सुनीता विल्यम्स यांची अंतराळातून पत्रकार परिषद

● नवी दिल्ली, (प्रतिनिधी) :



नासाचे अंतराळवीर सुनीता विल्यम्स तसंच बुच विल्मोर यांनी पत्रकार परिषदेत अनेक पश्नाची उत्तर दिली. त्यांनी स्पेस सेंटरमधून त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सुनीता विल्यम्स यांनी सांगितलं की, बोइंग विमान पृथ्वीवर रवाना झालं. त्यामुळं आमच्यासाठी बोईंग राईडला सोडण होतं. मला अंतराळात राहायला आवडतं. हे माझ्या आवडत्या ठिकाणांपैकी एक आहे. नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या यूएस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदान करण्याची इच्छा व्यक्त केली. कारण त्यांचा अवकाशातील मुक्काम किमान फेब्रुवारी २०२५ पर्यंत वाढणार आहे.

विल्यम्स आणि विल्मोर दोन्ही अंतराळवीर जूनपासून अंतराळ स्थानकावर अडकून पडले आहेत. स्टारलाइनर पृथ्वीवर परतल्यानंतर एका आठवड्यानंतर ही पत्रकार परिषद घेण्यात आली. या दोघांनी ५ जून रोजी त्यांच्या पहिल्या क्रू फ्लाइटसाठी बोईंगच्या स्टारलाइनर अड्डान घेतलं होतं. मात्र, स्टारलाईनमध्ये खराबी अल्यानं ते त्यांच्याशिवय पृथ्वीवर आणण्याचा निर्णय घेण्यात आला. तीन महिन्यांहून अधिक काळ अंतराळात राहिल्यानंतर हे यान ६ सप्टेंबर रोजी यशस्वीरित्या परत आलं. न्यू मेक्सिकोमधील व्हाईट सँड्स स्पेस हार्बरवर यानं सुरक्षित लँडिंग केलं.

दोन्ही अंतराळवीर एक्सपेडीशन ७१/७२ क्रूचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहतील. फेब्रुवारी २०२५ मध्ये नासा च्या स्पेसएक्स क्रीव-९ मोहिमेवरील इतर दोन क्रू सदस्यांसह स्पेसएक्स ड्रॅगन अंतराळ यानातून वापस येतील. अंतराळवीरांनी सांगितलं, आम्हाला अमेरिकेतील निवडणुकीत मतदान करायचं. तसंच मतदान करण नागरिकांची महत्त्वाची भूमिका असल्याचं त्यांनी म्हटलंय. "मी आजच मतासाठी माझी विनंती पाठवली आहे, ते काही आठवड्यांत आम्हाला मतदानाची मान्यता देतील," असं विल्मोर म्हणाले. नागरिक म्हणून त्या निवडणुकांमध्ये सहभागी होणं आपल्या सर्वांसाठी खूप महत्वाचं आहे. आम्ही त्या संधीसाठी उत्सुक आहोत. असं त्यांनी म्हटलं.

१९९७ पासून अंतराळवीर अंतराळातून मतदान करत आहेत. टेक्सास विधानसभेनं नासा कर्मचाऱ्यांना अंतराळातून मतदान करण्याची परवानगी देणारे विधेयक मंजूर केलं होतं, असं न्यूयॉर्क पोस्टनं वृत्त दिलंय. त्या वर्षी, नासाचे अंतराळवीर डेव्हिड वुल्फ मीर स्पेस स्टेशनवर अंतराळातून मतदान करणारे पहिले अमेरिकन बनले होते. २०२० मध्ये, नासा अंतराळवीर केट रुबिन्सनं देखील आयएसएस वर अंतराळातून मतदान केलं. सुनीता विल्यम्स म्हणाल्या की, स्टेशन लाइफमध्ये येणं तितकं अवघड नव्हतं, कारण आम्ही दोघेही इथं आधी राहत होते. "हे माझं आनंदाचं ठिकाण आहे. मला इथं अंतराळात राहायला आवडतं. ज्यावर आम्ही काम करणार आहोत, परंतु स्टारलाइनरमध्ये अंतराळात मानवांची ही पहिलीच वेळ आहे. पुढं विल्मोर म्हणाले की, कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यानं खूप संयम आणि चारित्र्य निर्माण होतं. "आम्ही सर्व प्रकारच्या परिस्थितींना तोंड देण्यासाठी शिकतो, प्रशिक्षण घेतो. हे फक्त नासामध्येच नाही, तर मी माझ्या संपूर्ण कारकिर्दीत हेच केलं आहे. काहीही झाले तरी आम्ही आमचे सर्वोत्तम काम दररोज करणार आहोत. कारण जे लोक या प्रकारचं काम करतात त्यांना तेच करावं लागेल.